Scan QR code to visit... Epaper Portal

www.sahyandrinews.com

# दैनिक सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३५ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.१३ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा, भाजपात जाणार ?



**मुंबई**–गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे भारतीय जनता पक्षात प्रवेश करतील, अशी चर्चा चालू आहे. अशातच चव्हाण यांनी काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. त्यामुळे चव्हाण आता भाजपाच्या वाटेवर असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. याविषयी बोलताना राज्यातील भाजपाचे वरिष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, काँग्रेसचे अनेक लोकनेते आगामी काळात भाजपात येतील. फडणवीस यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत फडणवीस म्हणाले, काँग्रेसमधील अनेक चांगले नेते, हे भाजपाच्या संपर्कात आहेत. ज्याप्रकारे काँग्रेस पक्ष गेले काही वर्ष वाटचाल करत आहे. त्यातून जनतेशी घट्ट जोडलेल्या नेत्यांची सध्या घुसमट होतेय. त्यामुळे देशभरातील काँग्रेसचे लोकनेते भाजपात प्रवेश करत आहेत. काही मोठे नेते लवकरच भाजपात प्रवेश करणार आहेत. त्यामुळे मी आता एवढंच म्हणेन, आगे आगे देखिये होता है क्याअशोक चव्हाण यांनी काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्याचबरोबर त्यांनी आमदारकीचाही (विधानसभा सदस्यत्वाचा) राजीनामा दिला आहे. तशी पत्रं त्यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना दिली आहेत. अशोक चव्हाण यांच्या राजीनाम्यानंतर पटोले हे काँग्रेस हायकमांडशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला रवाना होणार असल्याचं सांगण्यात येत आहे.अशोक चव्हाण यांनी विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याच्या चर्चांवर शिक्कामोर्तब करणारं एक पत्र सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. या पत्रात चव्हाण यांच्या नावापुढे माजी विधानसभा सदस्य असा उल्लेख आहे. याचाच अर्थ चव्हाण यांनी आधीच विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे, त्यापाठोपाठ त्यांनी काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला. नाना पटोले यांना लिहिलेल्या पत्रात अशोक चव्हाण यांनी लिहिलं आहे की, महोदय, मी दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ मध्यान्हापासून माझ्या इंडियन नॅशनल काँग्रेस (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा या पत्राद्वारे सादर करत आहे.त्यापाठोपाठ अशोक चव्हाण यांनी स्वतः समाजमाध्यमांद्वारे सर्व घडामोडींची माहिती दिली. चव्हाण यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, आज सोमवार, १२ फेब्रुवारी २०२४ रोजी मी ८५-भोकर विधानसभा मतदारसंघाच्या सदस्यत्वाचा राजीनामा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे दिला आहे. तसेच चव्हाण यांनी समाजमाध्यमांवरील त्यांच्याबाबतची माहिती अपडेट केली आहे. वेगवेगळ्या समाजमाध्यमांवर असलेल्या त्यांच्या प्रोफाईलवरील काँग्रेससंबंधीची सर्व माहिती हटवण्यात आली आहे.दरम्यान, अशोक चव्हाण काही वेळाने पत्रकार परिषद घेतील आणि त्यांची पुढची भूमिका स्पष्ट करतील, असा दावा काही वृत्तवाहिन्यांनी केला आहे. चव्हाण भाजपात जाणार की इतर कुठल्या पक्षाशी घरोबा करणार या प्रश्नाचं उत्तर या पत्रकार परिषदेत मिळू शकतं.

## शिवसेना (उबाठा) चे गाव तिथे शाखा अभियान

# जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात कोसरसार येथे शाखेचे उदघाटन

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोसरसार येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात शिवसेना शाखेचे मोठ्या जल्लोशात उदघाटन करण्यात आले.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व पूर्व विदर्भ संपर्क नेते आमदार भास्कर जाधव यांच्या आदेशाने जिल्हासंपर्क प्रमुख प्रशांत कदम व विधासभा प्रमुख रितेश राहाटे यांच्या मार्गदशनात जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वामध्ये वरोरा - भद्रावती विधानसभेत गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक या अभियानांच्या माध्यमातून शिवसेनेनला घरोघरी पोहचविण्याचे काम सुरु आहे.तालुक्यातील कोसरसार गावात असंख्य तरुण कार्यकर्त्यांना सोबत घेऊन शाखा उदघाटन सोहळा संपन्न झाला.ढोल ताश्याच्या गजरात भव्य मिरवणूक काढून जय भवानी जय शिवाजी हा नारा देत शिवसैनिकांनी संपूर्ण गावपरिसर दणाणून सोडला होता, जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी फिट कापून शाखेचे उदघाटन केले व याप्रसंगी उपस्तिथ शिवसैनिक व गावकऱ्यांशी संवाद साधला.यावेळी माजी नगरसेवक तथा युवासेना जिल्हा समन्वयक दिनेश यादव, शहर प्रमुख संदीप मेश्राम,राजुपाटील गावंडे, शाखा प्रमुख विनोद कुमरे, उपशाखा प्रमुख सुभाष वल्हादे,विलास मडावी, राजू लोहकरे, रतन परचाके व समस्त शिवसैनिक व गावकरी उपस्तिथ होते.

## मूल येथे झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सव

**मूल । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्या अंतर्गत सांस्कृतिक कार्य महासंचालनालय मुंबई व जिल्हा प्रशासन चंद्रपूर यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे वने,सांस्कृतिक कार्य,मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री नाम. सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात व चंद्रपूर जिल्हा भाजपा अध्यक्ष हरीश शर्मा यांच्या मार्गदर्शनात मूल येथे दिनांक १८,१९ व २० फेब्रुवारीला झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या तीन दिवसात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची मांदीयाळी रंगणार आहे.




झाडीपट्टीतील चंद्रपूर,गडचिरोली, श्रभंडारा व गोंदिया जिल्ह्यातील झाडीपट्टी कलाकार यात भाग घेणार आहेत.विकास पुरुष नाम. सुधीर मुनगंटीवार यांच्या सुयोग्य नेतृत्वात व मार्गदर्शनात हा झाडीपट्टी महा महोत्सव पार पडणार आहे. झाडीपट्टीतील जेष्ठ कलावंत पद्मश्री डॉ.परशुराम खुणे यांच्या मार्गदर्शनात व नाट्य कलावंत सदानंद बोरकर,देवेंद्र दोडके,मुकेश गेडाम,शेखर डोंगरे,अनिरुद्ध वनकर,युवराज प्रधान, युवराज गोंगले,अरविंद झाडे यांच्या सहकार्याने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी कला रसिकांना मिळणार आहे.तीन दिवस चालणाऱ्या या झाडीपट्टी महामहोत्सवात नाटक,दंडार, खडीगंमत,रेला नृत्य,आदिवासी नृत्य,कीर्तन,भुलाबाईची गाणी, रोवण्याची गाणी,महादेवाची गाणी, डहाका,संबळ,सुमधुर सुगम संगीत आदी कार्यक्रम या महोत्सवात सादर केले जाणार आहेत.दिनांक १९ फेब्रुवारीला शिवजयंतीच्या पर्वावर मूल शहरातून सांस्कृतिक महोत्सवानिमित्त रॅलीचे आयोजन केले आहे.या रॅलीत नाम. सुधीर मुनगंटीवार,सिने कलावंत, सिने अभिनेत्री आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या रॅलीत विविध नेत्रदीपक झाकी सादर केली जाणार आहेत.तीन दिवस चालणारे या सांस्कृतिक महोत्सवाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मूल येथील झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सव समितीने केले आहे.

# २८ फेब्रुवारी रोजी खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत शिबिराचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती व लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी एक दिवसीय जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिर बुधवार,दि.२८ फेब्रुवारी २०२४ रोजी भद्रावती तालुक्यातील चंदनखेडा येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील नागरीकांनी या शिबिरात सहभागी होऊन लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत १८ जुन २०१९ च्या शासन निर्णयानुसार मधकेंद्र योजना (मधमाशापालन) संपुर्ण राज्यात कार्यान्वित झाली आहे. या योजनेतंर्गत महिला, युवक-युवती, सुशिक्षित बेरोजगार, आदिवासी, ज्येष्ठ, नागरीक, अनुसूचित जाती-जमाती, स्वातंत्र्य सैनिक, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, स्वयंसहायता युवा गट, शेतकरी, शेतमजूर, भुमीहीन, पारंपारीक कारागीर आदी समाजातील सर्वच घटकांना या योजनेचा लाभ देय आहे.याशिवाय, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना आदी योजनाही महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येतात. या शिबीरामध्ये कृषि, वनविभाग, पंचायत समिती व इतर शासकीय कार्यालयाचा सहभाग असणार आहे. अधिक माहितीकरीता ९३७३२८७०५७/ ९३२२७८९२३२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. असे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

## पिकअप आणि दुचाकीची जोरदार धडक;दुचाकीस्वार गंभीर जखमी

**वरोरा**–तालुक्यातील वाठोडा गावाजवळ पिकअप आणि दुचाकीची जबर धडक झाली. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.



दुचाकी वाहन चालकास गावकऱ्यांनी तत्काळ वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी हलविले. रस्ता अरुंद असल्यामुळे मोठी वाहने या मार्गाने ये-जाण्यास अडचण होते. नेहमी या मार्गावर छोटे मोठे अपघात घडून येतात. सोमवारी वाहन क्र. एम.एच २९ टी ५८०६ पिकअप वाहन चना भरून जात असताना दुचाकी क्र एम एच ३४ ए शी ८०२ क्रमाकाच्या दुचाकीला जबर धडक दिली. यात दुचाकी स्वार गंभीर जखमी झाला असून त्याला वरोरा येथे उपचारा साठी हलवले आहे. अपघाताची माहिती शेगावं पोलीस स्टेशन ला देण्यात आली.पुढील तपास शेगाव पोलीस करत आहे.

## राहुल खापने बनले चंद्रपूर जिल्ह्यातील पहिले ‘ टायगर मॅन-१२२’

**वरोरा । प्रतिनिधी**

शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र येथे वरिष्ठ व्यवस्थापक या पदावर कार्यरत असलेले राहुल दिगांबर खापने यांनी ११ फेब्रुवारीला नागपूर येथे आयोजित मॉईल टायगर मॅन ट्रायथलॉन या स्पर्धेत ज्यात २ हजार मी पोहणे, १०० किमी सायकलिंग आणि २० किमी धावणे यात टायगर मॅन-१२२ गटात तिसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकावले असून ही स्पर्धा त्यांनी ६ तास ५८ मिनिटाच्या वेळात सलग पूर्ण केली. या स्पर्धेत अनेक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग घेतला होता हे विशेष, त्यांनी स्पर्धेत प्राप्त केलेल्या यशा बद्दल प्रत्येक स्तरांमधून त्याच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत असून ,त्यांनी या यशाचे




श्रेय आई प्रभावती व वडील दिगांबर खापने यांना दिले असून एम एन एम स्पोर्ट्स अकॅडमी चे संचालक व कोच डॉ अमित समर्थ, नागपूर तसेच मित्रपरिवार यांचे विशेष आभार मानले.

# जिल्हा परिषदेतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन दि. ९ ते ११ फेब्रुवारी कालावधीत जिल्हा स्टेडीयम, चंद्रपूर येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा हस्ते पार पडले.




यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रणजित यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळुंखे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) श्याम वाखर्डे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) राजकुमार हिवारे तसेच जिल्हा परीषदेतील विविध विभागाचे प्रमुख,पंचायत समितीचे गट विकास अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.सदर स्पर्धेमध्ये ॲथलेटिक्स प्रकारातील खेळ जिल्हा स्टेडीयम येथे, तालुका क्रीडा संकुल,विसापूर येथे स्विमिंग व बॅटमिंटन, क्रिकेट हा खेळ ओ.आर.सी.मैदान उर्जानगर येथे तर सांस्कृतिक स्पर्धा सेंट मायकल हायस्कुल सभागृह, रामनगर येथे घेण्यात आल्या. या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेत जिल्हा परिषद मुख्यालय संघ ॲथलेटिक्स, सांस्कृतिक व मार्च पास्ट, झांकी आदी प्रकारात सरस कामगिरी केल्यामुळे चॅम्पीयन ट्रॉफीचा मानकरी ठरला. तसेच सदर स्पर्धेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉनसन यांनी क्रिकेट, फुटबॉल व बॅडमिंटन आदी खेळामध्ये प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. त्यासोबतच जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी यांच्यासमवेत अधिकारी/कर्मचाऱ्यांनी देखील सहभाग घेतला.सदर स्पर्धेचा बक्षीस वितरण व समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी बोलतांना मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉनसन म्हणाले, जिल्हा परिषदेतील अधिकारी-कर्मचारी हे तळागाळातील जनतेच्या सर्वांगीन विकासाची कामे करत असतो. सदर कर्तव्ये पार पाडतांना ते प्रचंड तणावाखाली वावरत असतात. त्या तणावग्रस्त जीवणशैलीतून उसंत मिळण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांनी खेळ खेळले पाहीजे. जेणेकरून,आपले शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील व त्याचा सकारात्मक परिणाम प्रशासकीय कामकाजावर होईल. जिल्हा परीषदेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या उत्तम नियोजनातुन सदर स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

# गांव चलो अभियान प्रवास दौराप्रसंगी हंसराज अहीर यांचा लोणी ग्रामवसीयांसोबत संवाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भाजपाच्या गांव चलो अभियानाअंतर्गत दि. १० फेब्रुवारी रोजी पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी आर्णी तालुक्यातील लोणी या गांवास प्रवास करीत नागरीकांशी संवाद साधला. प्रारंभी मनिष पाटील यांच्या सोबत माजी खासदार स्व. उत्तमराव पाटील वडील भाऊसाहेब पाटील, मातोश्री स्व. वत्सलाबाई पाटील यांच्या स्मृतिस्थळास भेट देवून श्रध्दांजली वाहिली.



यावेळी लोणी वासियांनी अहीर यांचे वाजत गाजत उत्स्फुर्त स्वागत केले. यावेळी येथील मंदीरात शेकडो लोकांच्या उपस्थितीत पुजन व आरती केली. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, एन.टी जाधव विपीन राठोड, किशोर बावने, किसन राठोड, दिलीप मादेसवार, विशाल देशमुख, बाळासाहेब चावरे, रमेश चौव्हाण, राजेश माहेश्वरी, सुरेश चिल्लरवार, प्रमोद आडे, भाऊसाहेब आत्रे यांची उपस्थिती होती. ग्रामसभेमध्ये हंसराज अहीर यांनी केंद्र व राज्य सरकारी योजना व कृषी व शेतकऱ्यांच्या हितासाठी मोदीजींनी केलेल्या अभूतपुर्व कार्याची माहिती दिली.प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदीजींचे १० वर्षातील कार्य ग्रामिण विकास व शेतकऱ्यांना समर्पित असल्याचे सांगितले. गरीब, शेतकरी महिला व युवकांना सन्मान मिळवून देण्यासाठी ते कार्य करीत असल्याचे सांगितले.मागील कार्यकाळात लोणीवासीयांना सभागृह, रस्ते व अन्य सुविधा दिल्याबद्दल ग्रामस्थांनी हंसराज अहीर यांचा सन्मान केला. यावेळी येथील ८९ वर्षीय गांधीवादी व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नंदपूरे वयोवृध्द चौधरी व अन्य जेष्ठ नागरीकांचा अहीर यांनी सत्कार केला. शेतकरी बांधवांनी सीसीआय व नाफेडद्वारा कापूस व सोयाबीन खरेदी करण्यात यावी अशी सुचना केली. आपण याबाबत प्रयत्नरत असल्याचे उपस्थितांनी सागितले.या भेटीत अहीर यांनी बिरसा मुंडा व्यायामशाळेस भेट देवून उपस्थित युवकांशी विविध विषयावर चर्चा केली. देवीदासजी मुंदे वृध्द शेतकरी, माधवराव वायकर सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या गृहभेटी घेतल्या. माजी बुथ प्रमुख स्व. रमेश माहूरे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट देत कुटूंबियांचे सांत्वन केले. लाईनमन सोनटक्के यांच्या कुटूंबियाशी चर्चा केली. आजारी आतिष वैद्य यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. चावडीवर नागरीकांशी रात्री उशीरापर्यंत चर्चा केली व भाजपाचे मिशन महाविजय २०२४ चे ध्येय साकार करण्याचे आवाहन केले. त्यानंतर एन.टी. जाधव यांच्या शेतामध्ये मुक्काम करून अहीर यांनी चंद्रपूर करीता प्रस्थान केले.

# एवोलूशन-द वर्ल्ड इज ऑलवेज चेंजिंग!

**सुजलाम् सुफलाम् मलयज शितलाम्; शस्य शामलाम् मातरम्, वन्दे मातरम् ! असे सकाळचे मंगल सूर आज हरवले आहे, असे वाटते. एकेकाळी रेडिओ हा आपल्या जीवनाचा एक महत्वाचा भाग मानला जात होता. कारण माहिती, संवाद आणि गाण्यांच्या माध्यमातून मनोरंजनाचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून रेडिओचा उपयोग केला जात होता. मात्र, आज सर्वत्र नवनवीन माध्यमे आली आणि रेडिओचा वाापर कमी झाला. दरवर्षी १३ फेब्रुवारी हा दिवस मजागतिक रेडिओ दिवसफ म्हणून साजरा केला जातो. परंतु टेलिव्हिजन आणि मोबाईलचा शोध लागल्यानंतर रेडिओचा वापर कमी झाला. मात्र, आजूनही रेडिओचे महत्त्व कमी झालेले नाही. जागितक रेडिओ दिनाच्या निमित्ताने त्यासंदर्भातील संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी सादर करत आहेत... संपादक.**

जगभरातील लोकांना शिक्षित करण्याबरोबरच आजपर्यंत माहितीची देवाणघेवाण आणि रेडिओने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच रेडिओ हे पत्रकारांसाठीसुद्धा एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. रेडिओ हे माहिती पसरविण्याचे सर्वात शक्तिशाली साधन आहे. १३ फेब्रुवारी १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिल्यांदा प्रसारण झाले. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला जागतिक रेडिओ दिन औपचारिकपणे २०१२मध्ये साजरा करण्यात आला होता. जागतिक रेडिओ दिन २०२२ची थीम मफएवोलूशन- द वर्ल्ड इज ऑलवेज चेंजिंग होती. म्हणजेच विकासाबरोबर जगाचाही विकास होत आहे. थीम रेडिओची लवचिकता आणि टिकाऊपणा दर्शवते. याचा अर्थ जग जसजसे बदलत आहे, तसे रेडिओमध्येही नावीन्यता येत आहे. तरी आजही तो काळ आठवतो जेव्हा आपण रेडिओ ऐकून आनंदीत व्हायचो.

जागतिक रेडिओ दिवस दरवर्षी १३ फेब्रुवारी रोजी जगभरात साजरा केला जातो. या दिवशी दरवर्षी युनेस्को जगातील सर्व प्रसारक, संस्था आणि समुदायांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम आयोजित करीत असतो. संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवर चर्चा करून लोकांना त्याबद्दल जागरूक केले जाते. रेडिओ ही जगभरातील माहितीची देवाणघेवाण करणारी सेवा आहे. आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थितीत रेडिओचे महत्त्व वाढते. अशा परिस्थितीत जगभरातील तरुणांना रेडिओची गरज आणि महत्त्वाची जाणीव करून देणे, हा जागतिक रेडिओ दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. माहितीचा प्रसार करण्यासाठी रेडिओ हे सर्वात शक्तिशाली आणि स्वस्त माध्यम म्हणून ओळखले जाते. रेडिओ हे युगानुयुगे असले तरी त्याचा वापर संवादासाठी केला जात आहे. जागतिक रेडिओ दिवस कधी आणि का सुरू झाला? सन २०११ साली जागतिक रेडिओ दिनाची सुरुवात झाली. सन २०१०मध्ये स्पॅनिश रेडिओ अकादमीने प्रथमच १३ फेब्रुवारी हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. युनेस्कोच्या सदस्य देशांनी सन २०११मध्ये हा प्रस्ताव स्वीकारला आणि हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित केला. नंतर सन २०१२मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही ते स्वीकारले. त्यानंतर त्याच वर्षी १३ फेब्रुवारी रोजी युनेस्कोने प्रथमच जागतिक रेडिओ दिवस साजरा केला. याच दिवशी जागतिक रेडिओ दिन साजरा करण्याचे एक खास कारण आहे. वास्तविक, संयुक्त राष्ट्र रेडिओ १३ फेब्रुवारी १९४६ रोजी सुरू झाला. संयुक्त राष्ट्र रेडिओच्या वर्धापनदिनानिमित्त जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जाऊ लागला.

रेडिओ म्हणजे काय? रेडिओ म्हणजे एक असे यंत्र, जे विजेचा वापर करून इलेक्ट्रोमॅग्नेटिक तरंगे तयार करते, ज्यांच्या द्वारे संदेशाची देवाणघेवाण केली जाते. इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह पाठवणाऱ्या रेडिओला ट्रान्समीटर तर तरंगे म्हणजेच वेव्ह स्वीकारून त्याचे रूपांतर आवाजात करणाऱ्या रेडिओला रिसीव्हर असे म्हटले जाते. रेडिओ ३००




एचझेड इतक्या क्षमतेने इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह तयार करू शकते. जगातला पहिला रोडिओ इटलीचे शास्त्रज्ञ मार्कोनी यांनी बनवला. सन १८९५मध्ये त्यांनी रेडिओचा शोध लावला आणि त्याचे पेटंटही मिळवले. मार्कोनीला फादर ऑफ रेडिओ असेही म्हणतात. इंग्रजांनी आणि अनेक युरोपीयन देशांनी हे तंत्रज्ञान आपापल्या वसाहतीत नेले. याच माध्यमातून अमेरिका, आफ्रिका, आशिया खंड आणि ऑस्ट्रेलिया असा रेडिओचा प्रसार झाला. त्या काळी हे माध्यम प्रामुख्याने कम्युनिकेशनसाठी वापरले जात होते. विशेषतः युद्धकाळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, अनेक खेळांच्या कॉमेंट्रीसाठी रेडिओचा वापर होऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातही ब्रिटिशांनीच रेडिओ आणाला. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाची दोन केंद्रे सुरू झाली. त्यानंतर सन १९३२मध्ये भारत सरकारने भारतीय प्रसारण सेवा नावाचा एक विभाग सुरू केला. सन १९३६मध्ये त्याचे नाव ऑल इंडिया रेडिओ-एआईआर असे ठेवण्यात आले. दरम्यान, सन १९२०चे दशक येता येता रेडिओला व्यावसायिक स्वरुप प्राप्त झाले. तसेच सन १९५०पर्यंत रेडिओ लोकप्रिय झाला होता. भारतातही रेडिओची सुरुवात सन १९२०च्या दशकात झाली. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबईतून रेडिओ प्रसारण सेवा सुरू झाली. तसेच इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी लिमिटेडने मुंबई आणि कोलकता येथे रेडिओ स्टेशन सुरू केले. परंतु सन १९३०मध्ये ही कंपनी बंद पडली. त्यानंतर सरकारने ही कंपनी आपल्या ताब्यात घेत त्याला इंडियन स्टेट ब्रॉडकास्टींग सर्विस असे नाव दिले. त्यानंतर दि.८ जून सन १९३६मध्ये त्यांचे ऑल इंडीया रेडीओ असे नामकरण करण्यात आले. तसेच सन १९५६मध्ये पुन्हा याचे नाव बदलत आकाशवाणी करण्यात आले. हळूहळू आकाशवाणीचे जाळे देशभर पसरू लागले. आज २३ भाषांमध्ये ४१५ रेडिओ स्टेशनसह ऑल इंडीया रेडीओ ही जगातल्या सर्वात मोठ्या रेडिओ प्रसारण सेवेपैकी एक बनली आहे. तसेच सन २००१मध्ये भारतात खासगी रेडिओ स्टेशनलासुद्धा सुरुवात झाली होती.

रेडिओ हे सर्वात जुने माध्यम असले तरी, संवादाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. सन १९४५मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिले प्रसारण झाले होते. त्यामुळे हा दिवस मजागतिक रेडिओ दिवसफ म्हणून साजरा केला जातो. स्पेन रेडिओ अकादमीने सन २०१०मध्ये मजागतिक रेडिओ दिवसफ साजरा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर युनेस्कोच्या ६७व्या सत्रात १३ फेब्रुवारी हा दिवस मजागतिक रेडिओ दिवसफ म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या या निर्णयाला संयुक्त राष्ट्रसंघाने दि.१४ जानेवारी २०१३ रोजी मान्यता दिली. दरवर्षी युनेस्कोद्वारे जगभरातील रेडिओ प्रसारक आणि संघटनांनाच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवरसुद्धा चर्चा केली जाते. यावर्षी जागतिक रेडिओ दिवसाला मरेडिओ आणि विविधताफ ही थीम देण्यात आली आहे. तसेच विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संपर्क असे सबथीम सुद्धा देण्यात आले आहे.

!! समस्त श्रोत्यांना जागतिक रेडिओ दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन व शब्दांकन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी-**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली मोबा- ७७७५०४१०८६.**

# मोदी सरकारने गोरगरिबांना विकासाच्या प्रवाहात आणले-चेतनसिंह केदार-सावंत

## जुजारपूर, हातीद, वाढेगांव मध्ये गाव चलो अभियानाला प्रचंड प्रतिसाद

**सांगोला । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या १० वर्षांत देशाची सर्वांगीण प्रगती करत असताना देशातील गोरगरीब, वंचित, शोषित वर्गालाही विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून सर्वसमावेशक विकासाचा नवा मापदंड तयार केला, असे प्रतिपादन भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केले.

भारतीय जनता पक्षातर्फे व्यापक जनसंपर्कासाठी गाव चलो अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यातील जुजारपूर, हातीद आणि वाढेगांव या ठिकाणी नागरिकांशी संवाद साधताना चेतनसिंह केदार सावंत बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मोदी सरकारच्या कामगिरीची माहिती देण्यासाठी भाजपने महाजनसंपर्क अभियान आयोजित केले आहे. मोदी सरकारने गेल्या १० वर्षांत गोरगरीब, वंचित वर्गाच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याचे महत्त्वाचे काम केले. गरीब कल्याण योजनेद्वारे ८० कोटी जनतेला मोफत अन्नधान्य दिले जात आहे.



त्याचबरोबर गोरगरिबांसाठी २.५ कोटी घरे आणि ११.७२ कोटी शौचालये बांधण्यात आली आहेत. ९ कोटींपेक्षा अधिक कुटुंबांना उज्ज्वला योजनेद्वारे मोफत गॅस सिलिंडर दिला जात आहे. आयुष्यमान योजनेतून ५ लाखांपर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत दिले जात आहेत. मोदी सरकारच्या कामगिरीमुळेच भारताची अर्थव्यवस्था जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक बूथवर भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता पोहोचणार असून संघटन व्यवस्थापन, लाभार्थी भेटी, समाजातील विविध घटकांशी संवाद साधणार असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, माढा लोकसभा विस्तारक अनंत राऊत, भटक्या विभक्त आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष विजय इगोले, विष्णू हिप्परकर, अजित तवटे, विलास व्हनमाने, मोहन बजबळे, विश्वास करडे, गणेश घाडगे, संजय केदार, प्रदीप घाडगे, महेश घाडगे, गणेश भंडारे, योगेश भगत, संभाजी चव्हाण यांच्यासह भाजपचे बूथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# रोटरी क्लब सांगोला यांची अक्कलकोट सहल संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला रोटरी क्लब यांनी फॅमिली सह अक्कलकोट दर्शन व हुरडा पार्टी अशी सहल आयोजित केली होती.या सहलीचा उद्देश सर्वरोटरी फॅमिली यांचे एकत्र एक दिवस घालवणे, विचारांचे आदान प्रदान करणे व मजा- मस्ती करणे अशा पद्धतीचे स्वरूप होते. या सहलीमध्ये ३० व्यक्तींनी सहभाग घेतला.

पहिल्यांदा अक्कलकोट येथे चोळाप्पा महाराजांच्या मठास भेट दिली. त्याच ठिकाणी सर्व सदस्यांनी प्रसाद घेतला व त्यानंतर अक्कलकोट येथील म्युझियम मधील जुने शस्त्रागार पाहिले. त्यामध्ये सर्व प्रकारच्या तलवारी त्यांची माहिती देण्यात आली व अक्कलकोटच्या संस्थानिकांचा इतिहास सर्वांना सांगितला . त्यानंतर हुरडा पार्टीचे आयोजन करण्यात आले होते त्या ठिकाणी सर्व सभासद एकत्रित गेले व हुरड्याचा आनंद घेतला. अक्कलकोट या ठिकाणी श्री शिवराज बिराजदार व त्यांचे मेहुणे प्रमोद पाटील हे




दोघे दहा एकर ज्वारी खास हुरड्यासाठी वापरतात व हुरड्याची मोफत मेजवानी सर्वांसाठी ठेवली असते. या उपक्रमाचे त्यांचे हे सोळावे वर्ष होते. त्या ठिकाणची सर्व व्यवस्था बघून सर्व रोटरी सभासद भारावून गेले. कोणीतरी अशा प्रकारचा उपक्रम करून लोकांना आनंद देत असतो हे पाहून सर्वांना समाधान वाटले. हुरड्या बरोबर फरसाण , गुळ, शेंगा चटणी याची व्यवस्था करण्यात आली होती. ही सर्व व्यवस्था अगदी मंडप घालून चटई टाकून त्याच ठिकाणी लगेच भाजलेला हुरडा चोळून दिला जात होता. हुरडा हाताने चोळून काढून देणे फार कष्टाचे काम आहे . तरीसुद्धा अशा प्रकारची व्यवस्था या ठिकाणी या दोन शेतकऱ्याकडून करण्यात आली होती. या दोघांची मुलाखत रोटरी क्लब ने घेतली तसेच यादोघांना त्यांच्या कामाबद्दल सत्कार करून त्यांना रोटरी क्लबच्या वतीने आभार पत्र देण्यात आले. याबद्दलची माहिती देणारे व सर्व व्यवस्था करणारे आमचे क्लबचे उपप्रांतपाल जितेंद्र जाजू यांचेही क्लबच्या वतीने आभार मानण्यात आले. श्री रो.जितेंद्र जाजू दिवसभर आमच्याबरोबर राहून त्यांनी सर्व व्यवस्था पहिली. हुरडा पार्टी वेळी त्यांची पत्नी आई असे सर्वजण आमच्याबरोबरच सहभागी झाले. त्यांचेही सर्वांनी मनापासून आभार मानले. अशाप्रकारे रोटरीची अक्कलकोट सहल संपन्न झाली.

# गारपिटीमुळे शेतपिकाचे नुकसान, तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना २५ हजार प्रति हेक्टर मदत जाहीर करा

## शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांची मागणी : पदाधिकाऱ्यांनी दिले निवेदन



**वरोरा । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यात गेल्या २ दिवसामध्ये वादळी वाऱ्यासह गारपीट झाल्याने शेतमालाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे. त्यामुळे सदर नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये मदत जाहीर करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या मार्गदर्शनात शिवसेना पदाधिकारी यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.

वरोरा - भद्रावती तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. यामुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणात झाले आहे. याआधी नुकसान झालेल्या शेतमालाची देखील नुकसानीची मदत अद्यापही शेतकऱ्यांना मिळाली नाही.यावर आणखी भर पडली असून गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी व मागे झालेल्या पिकांचे नुकसानीच्या पिकविम्याची रकम सर्व पिडीत शेतकर्यांना लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे या मागणीला घेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या मार्गदर्शनात पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले.यावेळी शहर प्रमुख संदीप मेश्राम, जेष्ठ शिवसैनिक तथा शिवदूत बंडू डाखरे, जेष्ठ शिवसैनिक अनिल गाडगे, उपशहर प्रमुख मनीष दोहतरे, युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर, सचिन चीडे व आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# कोण, कशासाठी, कुठे जात आहे? हे जनता पहाते:सर्वकाही मिळालेले नेते काँग्रेस विचार धारेला सोडून जाताहेत हे दुर्देवी- नाना पटोले

**मुंबई**-माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिलेल्या राजीनामामुळे काँग्रेस पक्षाला चांगला धक्का बसला आहे. अशोक चव्हाण यांच्या राजीनाम्यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावरील नाराजी पुन्हा एकदा समोर आली आहे. यातच नाना पटोले हे तातडीने दिल्लीला रवाना झाले असल्याची माहिती समोर आली आहे. नाना पटोले यांनी अशोक चव्हाण यांच्या पक्ष सोडण्याबाबत आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. कोण, कशासाठी, कुठे जात आहे? हे जनता उघड्या डोळ्याने पाहत असल्याचं नाना पटोले यांनी म्हटले आहे. सर्व काही मिळालेले नेते काँग्रेस पक्षाला तसेच विचारधारेला सोडून जात आहे, हे अत्यंत दुर्दैवी असल्याचे देखील नाना पटोले यांनी म्हटले आहे.



काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते काँग्रेसचा विचार आणि लोकशाही वाचवण्यासाठी धर्म आणि हुकूमशाही वृत्तीच्या भारतीय जनता पक्षाच्या विरोधात पूर्ण ताकदीनिशी लढून त्यांना पराभूत करेल, असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे. नाव न घेता नाना पटोले यांनी अशोक चव्हाण यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. कोण, कशासाठी, कुठे जात आहे? हे जनता पाहत असल्याचे देखील ते म्हणाले.या संदर्भात काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, काँग्रेस पक्षाने अनेक नेत्यांना खूप काही काही दिले आहे. आज काँग्रेस पक्ष संविधान आणि लोकशाही वाचविण्याची लढाई लढत असताना सर्वकाही मिळालेले नेते काँग्रेस पक्षाला आणि विचारधारेला सोडून जात आहेत हे दुर्देवी आहे. कोण, कशासाठी, कुठे जात आहे? हे जनता उघड्या डोळ्याने पहात आहे. आम्ही सर्व काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते काँग्रेसचा विचार आणि लोकशाही वाचविण्यासाठी धर्मांध, हुकुमशाही वृत्तीच्या भारतीय जनता पक्षाविरोधात पूर्ण ताकदीनिशी लढून त्यांना पराभूत करू.

# स्वत:च्या वडिलांना कोणी घराबाहेर काढते का?:सुप्रिया सुळे

**बारामती**-स्वतःच्या वडिलांना कोणी घराबाहेर काढतं का? असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना खरमरीत सवाल उपस्थित केला आहे. तसेच सगळे घेऊन जातील मात्र इमानदारी कशी नेतील असे म्हणत त्यांनी अजित पवार गटावर जोरदार निशाणा साधला आहे. सुप्रिया सुळे काल बारामती दौऱ्यावर होत्या. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधत असताना त्यांनी हे विधान केले आहे.यावेळी बोलतांना सुप्रिया सुळे म्हणाल्या, ''उद्धव ठाकरेंचा पक्ष मराठी माणसाने स्थापन केला. हाच मराठी माणसाचे पक्ष ते घेऊन गेले. शरद पवार यांनी राष्ट्रवादीची स्थापना केली. स्वतःच्या वडिलांना किंवा घरातील ज्येष्ठांना तुम्ही घरातून बाहेर काढाल का?, ही आपली संस्कृती नाही. आपण सर्व रामाचे संस्कार जाणतो. रामांनी वडिलांसाठी सत्ता सोडली वनवास केला. हे आमचे संस्कार आहेत. आम्हाला दुसऱ्यांचे काही नको'', असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी अजित पवार गटावर टीका केली आहे.पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, ''अदृश्य शक्तीने राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंचे चिन्ह नेले. आज पक्ष आणि चिन्ह नाही मात्र सुप्रिया सुळेला मत द्या एवढेच मी सांगेन. पक्ष घेऊन गेले, चिन्ह घेऊन गेले, आमदार घेऊन गेले आता तुमची बहीण फकीर आहे. मात्र फकीर असले तरी माझी इमानदारी घेऊन जाऊ शकत नाहीत'' असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.वकिलांनी मला विचारलं कुठलं चिन्ह पाहिजे ? मी त्यांनाच म्हटलं तुला कुठलं चिन्ह घ्यायचं आहे ते घे. आम्ही



परत पक्ष उभा करू. दुसऱ्याच्या आशीर्वादाने मी महल बांधणार नाही. या राज्यामध्ये रामराज्य आणून दाखवेन हा शब्द तुम्हाला देते असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. तसेच सत्ता येईल आणि जाईल, पण लोक आपल्या सोबत राहिले पाहिजेत. मी कोणाशीही भांडत नाही कारण माझा विश्वास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानावर आहे. माझी लढाई हुकूमशाहीच्या विरोधात आहे'', असे विधान सुप्रिया सुळेंनी केले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा ताबा आणि चिन्ह राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने गेल्या आठवड्यात दिला. त्यामुळे अजितदादा गटात प्रचंड जल्लोष असला तरी शरद पवार गटासाठी हा मोठा धक्का आहे. आयोगाच्या या निर्णयावर दोन्ही गटाकडून आणि इतर पक्षांकडूनही प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. शरद पवार गटाच्या नेत्यांनी यावर नाराजी व्यक्त करतानाच पुन्हा उभे राहू आणि लढू असा विश्वास दर्शवला.

# तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन व स्पोर्ट डे उत्साहात संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**




न्यू राष्ट्रीय प्रेरणा कॉन्व्हेंट तथा राजीव गांधी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम)चिमूर येथे तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन व स्पोर्ट्स डे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी माजी मंत्री महाराष्ट्र राज्य तथा महासचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी डॉ.अविनाश वारजूकर तर उदघाटक म्हणून माजी आमदार तथा अध्यक्ष आदिवासी सेल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी डॉ. नामदेवराव उसेंडी हे होते. सह उदघाटक म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा क्षेत्र डॉ. सतिश वारजूकर,तसेच विशेष अतिथी म्हणून चिमूर तालुका काँग्रेस ज्येष्ठ नेते धनराज मालके, अध्यक्ष चिमूर शहर काँग्रेस कमिटी अविनाश अगडे, पालक प्रमुख अमित लोथे,पप्पू शेख,प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्ष श्री प्रभू राजारामजी शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था नागपूर सुष्मिता वारजूकर, कोषाध्यक्ष श्री प्रभू राजारामजी शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था नागपूर पलाश वारजूकर,उपस्थित होते. प्रास्तविक प्राचार्या स्नेहसंमेलन प्रमुख यामिनी खारकर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अविनाश वारजूकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्नेहसंमेलनाचे महत्व विद्यार्थ्यांच्या जीवनात अभ्यासाबरोबरच कितपत महत्वाचे असते यावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर डॉ. नामदेवराव उसेंडी यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबच खेळाचे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुष्मिता वारजूकर आपल्या शाळेत नर्सरी ते ७ पर्यंत इंग्लिश मीडियम शाळा सध्या सुरू असून ही शाळा शैक्षणिक दृष्ट्या चिमुर मध्ये पुढे जात असून या शाळेचे उत्तम स्नेहसंमेलन व्हावे हा नेहमीच आपला प्रयत्न राहील या शाळेला आपण बारावी पर्यंत पुढे नेणार आहोत नंतर पुढे चांगली उपयोगी कोर्स सुरू करण्याचा मानस आहे. आपण कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले.कार्यक्रमा प्रसंगी सहउदघाटक डॉ. सतिश वारजुकर यांनी सुद्धा मंचावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीकोनातून व त्यांच्या जिवनात प्रत्येक भागात उंच भरारी घेण्याकरिता वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येते. स्पोर्ट डे च्या माध्यमातून विविध खेळाचे तसेच स्नेहसंमेलनाचे माध्यमातून विविध कार्यक्रम गोंडी नृत्य, देशभक्ती पर नृत्य, अनेक राज्यावर वर आधारित नृत्य, एकाकिका, यांचे आयोजन शाळेकडून करण्यात आले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विध्यार्थी, पालक यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन अस्विनी कुरेकार तरआभार शेख यांनी केले.

# गोंडपिपरीत भव्य खुली राज्य स्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

तरुणांचा बौद्धिक,तार्किक, वास्तव,विचारांना चालना देण्याच्या हेतूने दि (१०) शनिवारी गोंडपिपरी येथील खैरे कुणबी समाज भवनात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा पार पडली.

सर्वोदय महाविद्यालय गोंडपिपरी, ओ.बी.सी कृती समिती,शिक्षण व रोजगार बचाव समिती, मानवतावादी विचार प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य खुली राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत,अकोला,नागपूर, वर्धा,गडचिरोली,चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्यातून स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.प्रथम क्रमांक विशाल नंदागवळी, अकोला तर नागपूरचा विनय पाटील दुसरा क्रमांक तर चंद्रपूरची स्वाती मेश्राम हिने तिसरा क्रमांक पटकावला.चतुर्थ क्रमांक आकाश कडुकर पाचवे क्रमांक सुरज गुरनुले प्रथम प्रोत्साहन अनिरुद्ध तळेगावकर वर्धा,द्वितीय प्रोत्साहनपर प्रतीक्षा वासनिक राजुरा तर चंद्रपूरची कोमल बोरकर तृतीय प्रोत्साहनपर, चतुर्थ राजनंदिनी गेडाम गोंडपिपरी,पाचवे पायल वाळके वरोरा हिने क्रमांक पटकावला. प्रथम पुरस्कार ७ हजार रुपये रोख रक्कम सन्मान चिन्ह.. दुसऱ्या क्रमांक विजेत्याला ५ हजार रोख रक्कम,तिसरे बक्षीस ३ हजार रुपये,चतुर्थ बक्षीस १ हजार रूपये रोख रक्कम तथा सन्मान चिन्ह, पाचवे बक्षिस तथा प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, प्रोत्साहनपर बक्षिस, सुरज माडूवार यांचे कडून ३ हजार रूपये या स्वरूपाचे वितरीत करण्यात आले.यावेळी परीक्षक म्हणून संविधान अभ्यासक रुपेश निमसरकार,ड.प्रशांत सोनुले,बळीराज निकोडे यांनी काम पाहिले.स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अक्षय उराडे व यांच्या सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# विचोडा (रै) येथे गाजली महिला ग्रामसभा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत विचोडा (रै) येथे महिला ग्रामसभेचे आयोजन करण्यात आलेले होते. याप्रसंगी गावातील महिलांनी मोठ्या संख्येने सभेत उपस्थिती दर्शवली. या ग्रामसभेत गावच्या सरपंच माधुरी सागोरे, ग्रामसेविका वनिता कोडापे, फेलो मंजू रामटेके, माजी ग्रा.पं.सदस्या अनिता पिंगे, सीआरपी रुंदा पिंगे, ग्रामसंघाच्या अध्यक्षा शालू पिंगे, ग्रामपंचायत सदस्य व बचत गटातील महिला उपस्थित होत्या. या महिला सभेत ग्रासरुट लिडरशिप कार्यक्रमाचे फेलो मंजू रामटेके व महिलांनी मिळून महिलांचे घरटॅक्स पावतीवर नाव आहे परंतु घरासमोर पती-पत्नी दोघांचेही नाव असलेली नेम प्लेट संपूर्ण गावांमध्ये लावून देण्यात यावे. गावामध्ये शंभर टक्के विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात यावे जेणेकरून महिलांना आधार कार्ड काढण्यास, पतीच्या मृत्यूपच्यात मालकी हक्क मिळवण्यासाठी समस्या येऊ नये, शेतीच्या सातबारावर नाव चढवण्यासाठी महिलांना समस्या येऊ नये अशी मागणी केली.विचोडा (रै) गावातील महिलासाठी तिळगूळ व हळदी कुंकवाचा कार्यक्रम दरवर्षी घेण्यात यावा. ग्रामसभेबाबत गावांमध्ये नोटिसा लावण्यात यावे जेणेकरून लोकांना ग्रामसभेची माहिती होईल व महिलांची उपस्थिती वाढेल इत्यादी मागण्या महिलाद्वारा ग्रामसभेमध्ये करण्यात आल्या. ही ग्रामसभा उत्स्फूर्तपणे महिलांच्या उपस्थितीत यशस्वी झाली. यावेळी मागण्या पूर्ण करण्याचे सकारात्मक आश्वासन ग्रामपंचायत द्वारा देण्यात आले.

# प्रा.आ.केंद्र पाटण येथे जन आरोग्य समितीचे एकदिवसीय प्रशिक्षण संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**




दि.९ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान, स्टापी संस्था पुणे व प्रकृति महिला विकास केंद्र चंद्रपूर द्वारा प्रा.आ.केंद्र पाटण येथील व अंतर्गत येत असलेले उपकेंद्र नंदप्पा, हिरापूर, पुनागुडा येथील जन आरोग्य समिती सदस्यांचे एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी जीवतीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल टेंभे, प्रा.आ.केंद्र पाटणचे वै.अधिकारी डॉ.कविता शर्मा, प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक निलेश देवतळे, जिल्हा क्षेत्र पर्यवेक्षक अक्षय देशमुख, हिरापूरचे मानसेवी अधिकारी डॉ. सचिन चिकाटे, सामुदायिक आरोग्य अधिकारी अभिनव काकडे, काजल मत्ते, तालुका समन्वयक संभाजी ढगे, मंगला घटे, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यीका, सरपंच, शाळेचे मुख्याध्यापक, ग्रा.पं. सदस्य, आशा वर्कर, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका, ग्राम आरोग्य दूत व समिती सदस्य उपस्थित होते.सदर कार्यशाळेत डॉ.स्वप्नील टेंभे यांनी समिती बळकट करण्यासाठी सर्व समिती सदस्यांनी पुढाकार घ्यावा व आरोग्य यंत्रणा उत्कृष्ट दर्जाची करण्याचा प्रयत्न करावा असे मनोगत व्यक्त केले. तसेच डॉ.कविता शर्मा यांनी जन आरोग्य समितीमध्ये समुदायाचा सहभाग मिळवून समितीला बळकट करावे, आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांवर प्रतिबंधात्मक उपाय योजना व ग्रामपंचायतनी आरोग्यावर खर्च करायचा निधी आरोग्य यंत्रणेला देऊन सहकार्य करावे याबाबत मत व्यक्त केले.प्रमुख प्रशिक्षक म्हणून जिल्हा समन्वयक निलेश देवतळे यांनी आरोग्यासाठी सामाजिक कृती कार्यक्रमाची पार्श्वभूमी सांगून, आरोग्य म्हणजे काय, आरोग्यावर परिणाम करणारे विविध घटक, आरोग्याची काळजी घेणे, समिती तयार करण्या मागची गरज, समितीचा निधी रुग्णाच्या कल्याणासाठी खर्च व्हावा, समितीचा उद्देश इत्यादी विषयावर प्रशिक्षण दिले.तसेच जिल्हा क्षेत्र पर्यवेक्षक अक्षय देशमुख यांनी जन आरोग्य समितीची रचना, भूमिका, जबाबदाऱ्या, कार्य, निधी, बैठका व विविध आरोग्याच्या योजना इत्यादी विषयावर प्रशिक्षण दिले.प्रशिक्षणाचे संचालन संभाजी ढगे व आभार मंगला घटे यांनी मानले. या प्रशिक्षणात मोठया संख्येने समिती सदस्यानी सहभाग घेतला.

# मनसेच्या कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश

**परभणी । प्रतिनिधी**




लोकसभा मतदार संघातील प्रत्येक कार्यकर्त्यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहणार असा शब्द परभणी लोकसभा संयोजक माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना दिला.

११फ्रेबुवारी रोजी आमदार मेघना साकोरे बोर्डीकर जनसंपर्क कार्यालयात पक्षप्रवेश सोहळा मोठ्या संख्येने पार पडला यावेळी परभणी लोकसभा प्रमुख मा.आ. बोर्डीकर,विजयराव वरपूडकर डॉ.केदार खटिंग, ग्रामीण जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे, महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, आनंद भरोसे व इतर पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे परभणी गंगाखेड पाथरी पालम शहरातील अनेक कार्यकर्ते सह सोनपेठ येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पांडुरंग राठोड व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला या कार्यक्रमाचे नियोजन सुनील देशमुख,बाळासाहेब भालेराव दैवट लाटे आकाश लोहट यांनी केले. यावेळी व्यासपीठावर मंगलताई मुदगलकर,प्रिया कुलकर्णी, अन्नपूर्णे मॅडम सुरेश भुमरे,विलास बाबर, मोकिंद खिल्लारे ,रीतेश झाम्बड ,भीमराव वायवळ, प्रभाकर शिंदे ,प्रशांत सांगळे आदी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमधून राहुल कनकदंडे (जिल्हा सचिव परभणी) कृष्णा मुंदडा (राज्य कार्यकारणी सदस्य मनविसे) लखन गरुड (जिल्हा संघटक) अक्षय गोरे ,राहुल मकासरे ,सुदाम शेळके ,बॉबी बोबडे, किशोर डुबे ,सुरज कांबळे, स्वराज उंबरेकर ,आदित्य वावळे, ओम गायकवाड, गोविंद ननवरे, सदा उबाळे व आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करून येणाऱ्या काळात प्रत्येक निवडणुकीमध्ये आम्ही सर्वजण एका जोमाने काम करू असा शब्द सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने भारतीय जनता पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना देण्यात आला यावेळी मा.आ.बोर्डीकर ,विजयराव वरपूडकर ,डॉक्टर केदार खटिंग ,संतोष मुरकुटे ,राजेश देशमुख , आनंद भरोसे, विलास बाबर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील देशमुख यांनी तर सूत्रसंचालन बाळासाहेब भालेराव यांनी केले यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रिय काँग्रेसच्या मानवत तालुका अध्यक्षपदी बाबासाहेब आवचार



**मानवत । प्रतिनिधी**

तालुक्यातील देवलगाव आवचार येथील मानवत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक कारभारी उर्फ बाबासाहेब आवचार यांची मानवत तालूका राष्ट्रिय काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. निवडीचे पत्र आ. सुरेश वरपूडकर यांनी दिले. या वेळी परभणी कृ.उ.बा.समितीचे माजी सभापती समशेर वरपूडकर, परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालीका प्रेरणाताई वरपूडकर, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बालकिशन चांडक, अॅड. सतिशराव बारहाते या निवडीबद्दल उपस्थित सर्वांनी अभिनंदन केले. यावेळी कृषि ऊत्पन्न बाजास समितीचे माजी संचालक चंद्रकांत नाना सुरवसे पाटील, राष्ट्रीय कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष शामभाऊ चव्हाण, ओबीसी सेल चे तालूका अध्यक्ष बाळासाहेब भांगे ,

माजी नगर सेवक अॅड ऋषिकेश बारहात्ते पाटील, पांडूरंगजी मूळे पाटील, अन्नासाहेब मगर पाटील, माजी नगर सेवक श्रीकांतजी देशमूख , बाबासाहेब सूरवसे पाटील, अॅड विक्रमसिंहजी दहे पाटील , माजी नगर सेवक अनंत मामा भदर्गे , जनार्धनजी किर्तने आदी सह या वेळी राष्ट्रीय कॉंग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

# मुख्याधिकारी विकास मीना यांनी घेतला पैठण पं.स.च्या विवीध विकास कामांचा आढावा

**पैठण । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परीषद मुख्याअधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली दि. (९ ) रोजी पैठण तालुक्यातील विविध विकास कामा संबंधीची आढावा बैठक पंचायत समितीच्या सभागृहामध्ये संपन्न झाली.

या बैठकीत प्रामुख्याने ग्रामपंचायत कर वसुली, दिव्यांग बांधवांच्या पाच टक्के खर्चावर मुख्यआधिकारी यांनी भर देत तालुक्यातील ग्राम पंचायतच्या ग्रामविकास अधिकारी यांनी कोणत्याही परिस्थितीत पंधरा दिवसात शंभर टक्के कर वसुली करावी अशी सक्त ताकीद दिली.तसेच ज्या ग्राम पंचायतीचा दिव्यांग,अंगणवाडी,आशा वर्कर आणि मागासवर्गीयांसाठी असलेला निधी जो आजपर्यंत खर्च झाला नाही अशा ग्रामपंचायतींना व ग्रामसेवकांना यावेळी धारेवर धरले.तसेच तालुक्यातील ६६ ग्रामपंचायती मधे जल जिवन मिशनचे कामे पूर्ण झाले आहे व त्यांचे हस्तांतरण अद्यापही झाले नसल्याने त्या ग्रामसेवकांना व ग्रामपंचायतींना हस्तांतरण बाबत सूचना देण्यात आल्या २०११ च्या जनगणनेनुसार ज्या ग्रामपंचायतीची लोक संख्या ३०००पेक्षा जास्त आहे.अशा ग्रामपंचायतींना जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत जन सुविधा नागरिक सुविधा विषयाच्या योजने अंतर्गत अभ्यासिका केंद्रांसाठी प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे सूचित करण्यात आले. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या अवस्थेच्या विकास योजने अंतर्गत सन २३-२४ या वर्षासाठी नवीन प्रस्ताव ज्या ग्राम पंचायतीनी सादर केले नाही त्यांनी ते तात्काळ सादर करावे अशा सूचना केली.तसेच रोजगार हमी योजने अंतर्गत मंजूर असलेली कामे ३१ मार्च २०२४ पूर्वी पूर्ण करण्याचे सुचविले. ग्रामपंचायत स्तरावरील १५ वित्त आयोगाचा अखर्चीत निधी २० दिवसाच्या आत खर्च करण्याचे आदेश पैठण गट विकास अधिकारी यांना दिले. यावेळी गट विकास अधिकारी संजय कुलकर्णी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांचे स्वागत केले. त्यानंतर पैठण ग्रामसेवक संघटनचे तालुकाध्यक्ष खंडू वीर यांनी स्वागत केले.यावेळे उपअभियंता संभाजी असोले सहाय्यक गट विकास अधिकारीगायकवाड मॅडम, पाणी पुरवठा उप आभियंता खंदारे,प्रशासन अधिकारी राजेश कांबळे, कनिष्ठ प्रशासनाधिकारी किशोर निकम, सहाय्यक लेखा अधिकारी किरण सरोटे,कृषी अधिकारी रामकिशन पाटील पशु वैद्यकीय अधिकारी चौरे, यांच्यासह एकात्मिक बालविकास प्रकल्पचे शिवाजी वने, प्रकल्प २ च्या श्रीमती जोत्सना गहीरवार, गट शिक्षणाधिकारी राम केदार,स्थापत्यअभियंता गंगाधर निसर्गंध,अभियंता कमलाकर शिंदे,बाबुराव दूरपुडे,संदीप एडके, विस्तार अधिकारी इंगळे, ईश्वर सोमवंशी,कनिष्ठ सहाय्यक संजय पवार,घरकुल विभागाचे अविनाश चपडे, निखिल खिस्ती, हर्षद गोपनारायण, कृषीच्या अयोध्या जाधव,नागेश निलावाड,शैलेश सरसमकर इत्यादींची उपस्थिती होती.



# अमरावतीचा विजय भोयर ठरला आमदार श्री चा मानकरी तर अकोल्याच्या शेख सलिमने पटकविला बेस्ट पोझर ऑफ विदर्भचा मान

## बॉडी बिल्डिंग स्पर्धा पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी, निलेश दगडेच्या शो ने भरली आयोजनात रंगत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाला सुरवात करण्यात आली आहे. दरम्यान डिस्ट्रिक्ट बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस स्पोट्र्स असोसिएशन चंद्रपूर यांच्या सहकार्याने चंद्रपूर महानगरपालिका पटांगणावर पार पडलेल्या भव्य विदर्भ राज्यस्तरीय बॉडी बिल्डींग अंजिक्यपद स्पर्धेत अमरावतीचा विजय भोयर आमदार श्री चा मानकरी ठरला आहे तर अकोल्याच्या शेख सलिमने बेस्ट पोझर ऑफ विदर्भचा मान मिळविला आहे. यवतमाळच्या महोम्मद शहजाद यांना बेस्ट इम्प्रुव्हड ऑफ ईअर चा पूरस्कार मिळाला आहे. मान्यवरांच्या हस्ते सर्व विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरित करण्यात आले.






यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे, माजी नगर सेवक पप्पू देशमूख, सुर्यकांत खनके, माता महाकाली महोत्सव समीतीचे कोषाध्यक्ष पवन सराफ, डॉ. अशोक वासलवार, सुभाष बोमिडवार, अजय वैरागडे, श्याम धोपटे, आदींची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.सदर स्पर्धा ५५, ६०, ६५, ७०, ७५ आणि खुला अशा सहा गटात घेण्यात आली. यात ५५ वजन गटात चंद्रपूरचा सुरज तिवाडे, ६० किलो वजन गटात बुलढाणाचा दत्तात्रय सावरकर, ६५ किलो वजन गटात मोहमद सहजाद, ७० किलो वजन गटात शेख सलिम, ७५ किलो वजन गटात अकोल्याचा साहेब साहिल तर खुल्या गटात अमरावतीचा विजय भोयर प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. या स्पर्धेत चंद्रपूरच्या बॉडी बिल्डरनेही घवघवीत यश प्राप्त केले आहे. यात चंद्रपूरच्या शिवाजी वाकोडे याने ५५ वजन गटात तिसरा क्रमांक, संकेश भगत पाचवा क्रमांक, ६५ किलो वजन गटात शीव कुमार चौहान यांनी ५ वा क्रमांक, ७० किलो वजन गटात शुभम उराडे याने ५ क्रमांक पटवीला आहे. यावेळी आमदार श्री ठरलेल्या विजय भोयर यांना ५१ हजार १११ रुपये व ट्रॉफी, बेस्ट पोझर ठरलेल्या शेख सलिम याला ३१ हजार १११ रुपये ट्रॉफी आणि बेस्ट इम्प्रुव्हसाठी महोम्मद शहजाद याला २१ हजर १११ रुपये आणि ट्रॉफी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी मुंबईचे प्रसिध्द बॉडी बिल्डर निलेश दगडे यांनी स्टेज शो करत कार्यक्रमात रंगत भरली. त्यांचा शो पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. चंद्रपूर, अमरावती, अकोला, बुलढाना, वासिम, वर्धा, यवतमाळ, नागपूर येथील जवळपास ७० स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यावेळी चंद्रपूरचे दिलिप शेंगारप, नागपूरचे अरुन देशपांडे , वेनु गोपाल, अकोल्याचे संजय देशमूख , चंद्रपूरचे नरेंद्र भुते , दिलीप करकाडे, नागपूरचे चंद्रशेखर वनकर, चंद्रपूरचे शेख साजित, पन्नालाल बहोरिया आदींनी पंच म्हणून उत्तम गामगिरी बजावीली. या आयोजनाच्या यशस्वीतेसाठी यंग चांदा ब्रिगेडचे प्रसिध्दी प्रमूख नकुल वासमवार, अल्पसंख्याक विभागाचे युथ शहर अध्यक्ष राशेद हुसेन, शहर संघटक राम जंगम, नितेश गवळी, कार्तिक बोरेवार आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन नासिर खान यांनी केले.श्री माता महाकाली क्रिडा महोत्वाच्या माध्यमातून आपण चंद्रपूरातील बॉडी बिल्डरांना मोठे मंच उपलब्ध करुन देत आहोत. यात प्रसिध्द बॉडी बिल्डरांना आपण आमंत्रीत करुन येथील बॉडी बिल्डरांना प्रोत्साहीत करण्याचे काम करत आहोत. यंदा हे तिसरे वर्ष असून दरवर्षी यात स्पर्धकांचा सहभाग वाढत चालला आहे. हे या आयोजनाचे यश आहे. दरवर्षी असे आयोजन आपण करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. आजचा युवक व्यसनाकडे वळत आहे. मात्र अशात आपण शरिर सुदृढ करण्याच व्यसन अंगीकारल आहे. आपण या क्षेत्रात स्वताचे आणि पर्यायाने चंद्रपूरचे नाव गौरवांकीत करावे असे यावेळी बोलतांना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. तर या प्रसंगी बॉडी बिल्डर यांना मार्गदर्शन करतांना निलेश दगडे म्हणाले की, चंद्रपूरात ही स्पर्धा पाहण्यासाठी आलेली गर्दी उत्साह वाढविणारी आहे. मुंबई सारख्या शहरात होणा-या आयोजना सारखेच हे आयोजन असून हे उत्तम आयोजन आहे. या शहरात बॉडी बिल्डिंग खेळाला दिल्या जात असलेले प्रेम मनोबल वाढविणारे आहे. बॉडी बिल्डींग क्षेत्रात येण्यासाठी ईच्छुक असलेल्या युवकांमध्ये शिस्त असली पाहिजे. या क्षेत्रात उद्या या शब्दाला जागा नाही. आजची कसरत आजच केली पाहिजे. यात खंड पडू देउ नका. खानपान योग्य ठेवा असे ते यावेळी म्हणाले.

# शाळेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चांदापूर येथे सेवाव्रतीचा सत्कार व सांस्कृतिक कार्यक्रम

**मूल । प्रतिनिधी**

चांदापूर येथील शाळेला ७५ वर्ष पुर्ण झाल्या प्रित्यर्थ अमृत महोत्सवी वर्ष म्हणून जि.प.उच्च प्राथमिक शाळा चांदापूर येथील मुख्याध्यापक अनिल नैताम,सुरेश जिल्हेवार,सुनिल निमगडे,रुपेश परसवार,कविता रोकमवार व ज्योती सुर्यवंशी यांच्या प्रयत्नातून विध्यार्थ्यांचा सांस्कृतिक महोत्सव व चांदापूर येथील सुपुत्र जेष्ठ सेवाव्रती व सेवाव्रती यांचा सत्कार सोहळा व विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला.



या कार्यक्रमासाठी चांदापूर गावच्या प्रथम नागरिक सरपंच सोनीताई देशमुख,उपसरपंच अशोकराव मार्गनवार,पोलीस पाटील ज्ञानदेव अर्जुनकार ह.भ.प. मुर्लीधर कार्तीक स्वामी,शा व्य अध्यक्ष ताराचंद शेडमाके,उपाध्यक्ष रक्षाली पाल,सुनिता कडूकार, प्रतिक्षा नागापूरे,वंदना कोरेवार, विनोद कोहपरे,प्रफुल तिवाडे, ब्रम्हानंद मडावी सर्व सदस्य ग्राम पंचायत,सुरेश देशमुख,गजानन भोयर,संदीप पाल,प्रमोद गेडाम, पद्माकर शेडमाके,लाटेलवार , नंदेश्वर सर्व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती त्याचप्रमाणे विनायकराव झरकर, खुशालराव शेरकी माजी सरपंच व राजू पोटे, दिलीप पाल,माजी उपसरपंच यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सेवाव्रतीचा सत्कार सोहळा पार पडला.सर्व प्रथम सेवानिवृत्त मनोहरजी पाल, अशोक पाल,राजू मडावी, वामनराव शेरकी यांचा मानवस्त्र श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर दिनकर चामलवार, श्रसदन मुनगेलवार,मनोज कुमरे,विजय मडावी,नंदकिशोर शेरकी,लोमेश मिडपलवार,नितीन शेरकी,सदानंद पाल,रविंद्र कंकलवार,विनोद कोहपरे,चांगदेव चिंचोलकर, शिल्पा चिंचोलकर,उमेश कडूकार,धनंजय लेनगुरे व एम.बी. बिएस साठी नंबर लागलेले गौरव मर्लेवार या सर्वांना मानवस्त्र,श्रीफळ व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. सर्व सेवाव्रतीनी असा आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल चांदापूर शाळेच्या सर्व शिक्षक वृदांचे कौतुक केले व गावातील तरुण आणि विद्यार्थी यांच्याशी हितगुज करून आम्ही या शाळेचे माजी विद्यार्थी असून या शाळेसाठी देणेकरी लागतो व आपल्या गावची शाळा ही तालुक्यातुनच नाही तर जिल्ह्यातून प्रथम यावी.व प्रत्येक पालकांनी शाळेप्रती जिव्हाळा ठेवावा व आपल्या पाल्याकडे विशेष लक्ष दयावे.असा भाव व्यक्त केला . त्याचप्रमाणे गावातील जुन्या वारसांचे जतन करावे असे मत व्यक्त केले .या कार्यक्रमा प्रसंगी गावातील बहुसंख्य प्रतिष्ठीत नागरीक माजी पदाधिकारी,वयस्क व तरुण त्याचप्रमाणे सर्व महिला व सर्व विध्यार्थी उपस्थित होते.

# गाव चलो अभियानात डॉ.अशोक जीवतोडे यांचा सहभाग



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून महानगर पालिका अंतर्गत वडगाव प्रभाग व सिव्हील लाईन परिसरात गाव चलो, बूथ चलो अभियान राबविण्यात आले. यावेळी नागरिकांना राज्य व केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना समजावून सांगण्यात आल्या.

या अभियानात अंत्योदय योजना, सशक्त शेतकरी समृध्द भारत, सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, राष्ट्र प्रथम, सशक्त भारत, पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास, आरोग्यम धनसंपदा, महिला शक्ति नवी गती, राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास, सामाजिक न्याय, कृषी कल्याण, गडकिल्ल्यांचे व तीर्थ क्षेत्रांचे संवर्धन आदी योजनांची माहिती देण्यात आली.या विविध योजनांचे जे लाभार्थी झालेले नसेल अशा नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. अशोक जीवतोडे यांनी केले आहे.यावेळी मनोहर गाठे, सचिन दिघाडे, प्रवीण दिघाडे, नितीन कुकडे, प्रकाश गाठे, शामराव बदकुलवार, मधुकर हिरादेवे, सतीश शाहू, सतीश बिजेवार, गोपाळ वाटेकर, दादा दहेकर, प्रवीण साखरकर, रवि जोगी, महेश यार्दी, जितेंद्र केराम, सुखलाल चुधरी, आदी व परिसरातील शेकडो नागरिक सहभागी झाले होते.

# रमाबाई महिला मंडळाद्वारे ॲड.पी.डी.काटकर यांचा सत्कार

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील पळसगाव खुर्द येथील रमाबाई महिला मंडळातर्फे माता रमाई जयंती उत्सवात फुले -आंबेडकर स्मारक समितीचे आणि भिम-ज्योती सार्वजनिक वाचनालय ओवाळ्याचे सचिव,डी.बी.ओ.साहित्य मंचचे मार्गदर्शक डो.पी.डी.काटकर यांचा बुधवारी जाहीर सत्कार करण्यात आला.



पी.डी.काटकर यांचा झाडीबोली साहित्य संमेलन बाम्हणी खडकी,जिल्हा गोंदिया येथे नुकताच कळा या लागल्या जीवा हा कविता संग्रह प्रकाशित झालेला आहे.तसेच त्यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी वकिलीची (एल एल बी) परीक्षा प्राविण्यासह उत्तीर्ण करून डव्होकेटची पदवी मिळविली आहे. ते आंबेडकरी विचारवंत सुद्धा आहेत.त्यांच्या या सामाजिक सेवेबद्दल रमाबाई महिला मंडळातर्फे माता रमाई जयंती कार्यक्रमात त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी रमाई महिला मंडळाच्या अध्यक्ष सुमन खेकारे,सचिव रेशमा शेंडे,माजी सचिव बबिता रामटेके, पोलीस पाटील प्रविण रामटेके, रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशनचे अध्यक्ष कृष्णा शेंडे,शिवाजी युवा मंच अध्यक्ष हिमांशू मेश्राम,बौद्ध समाज पळसगाव खुर्दचे अध्यक्ष गंगाधर रामटेके,फुले आंबेडकर स्मारक समिती,दीक्षाभूमी बोकड डोहचे अध्यक्ष डॉ.मनोहर टेंभूरकर आदींची उपस्थिती होती.काटकर यांनी आजपर्यन्त बँक अधिकारी,लोक विद्यालय सावरगाव, तळोधी शाळेत शिक्षक,इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठ हैद्राबाद अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था बाबूपेठ चंद्रपूर येथील जिल्हा आंग्लभाषा केंद्रात मुख्य प्रशिक्षक व जिल्हा समन्वयक,अनुसयाबाई पोशट्टीवार इंग्लिश स्कूल तळोधी (बा.)येथे प्राचार्य आणि ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार अंतर्गत बँक ऑफ इंडिया स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, गडचिरोली येथे कार्यक्रम समन्वयक अशा विविध स्तरांवर प्रभावशाली सेवा करुन त्यांनी यशस्वी कार्याचा ठसा उमटविला आहे.या त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला आहे.याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# भद्रावती येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांना सुरुवात

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक प्रियदर्शनी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने काल दिनांक १२ रोज सोमवारला प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर जिल्हास्तरीय शासकीय तथा अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या तीन दिवसीय क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातील क्रिकेटचे१६, संघ, कबड्डी १६ तर व्हॉलीबॉलचे १० संघ असे एकूण ४२ संघ सहभागी झाले आहे. सदर क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त भैय्याजी यरमे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रियदर्शनी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे संचालक तथा इंटक नेते धनंजय गुंडावार, डॉ. यशवंत घुमे, माजी न.प. उपाध्यक्ष प्रफुल चटकी, पत्रकार सुनील बिपटे, साई आयटीआय चंद्रपूरचे संजय भाकरे, सोनाली गुंडावार, प्राचार्य प्रवीण बाळसराफ, सुरज चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. आजच्या काळात सर्वसाधारण




आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण हे महत्त्वाचे ठरत असून या अभ्यासक्रमातून त्यांना हमखास रोजगार उपलब्ध होत असतो असे मत उद्घाटक श्री येथे यांनी व्यक्त केले व विद्यार्थ्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी मैदानी खेळ खेळणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी अन्य मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. उद्घाटनपर कार्यक्रमाला प्रशिक्षण संस्थेचे शिक्षक वृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दबंग आगार प्रमुख येताच काम चोरांचे धाबे दणाणले

**राजुरा । प्रतिनिधी**

काही वर्षांपासून राजुरा एसटी आगाराला ग्रहण लागले असल्याचे पाहायला मिळत होते , बसेस वेळेवर न येणे, बसेस रद्द होणे, बसेस मधे बिघाड येणे, तिकीट मशीन मधे बिघाड येणे, चालक कमी असणे, वाहक कमी असणे, चालक ओटीवर असणे, वाहक ओटीवर असणे, अचानक चालकाची प्रकृती बिघडने, अचानक वाहकाची प्रकृती बिघडने, डेपोत डिझेल नसणे, मार्गावर प्रवाशी नसणे इत्यादी ठरलेले कारणे सांगून बसेस नियमित चालत नव्हती, बस स्थानक प्रमुख बसस्थानकावर बसत नव्हते

परंतु या सर्व बाबींचा अभ्यास करून आत्ताच आलेले नवनियुक्त आगार प्रमुख मनोज डोंगरकर यांनी स्वतः कामाच्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष उपस्थित राहून काम करत आहेत.त्यामुळे राजुरा बस आगारातून बसेस नियमित आणि वेळेवर निगत आहेत व पूर्ण किलोमिटर अंतर सहज पार करीत आहेत, प्रवाशांच्या सेवेसाठी असे ब्रीद वाक्य असलेली एसटी आता खरंच प्रवाशांच्या सेवेसाठी तत्पर सेवा देत असल्याचे पाहायला मिळत असून प्रवाशांमध्ये लालपरी बद्दल आणि नव्याने रुजू झालेल्या एसटी चे आगार प्रमुख मनोज डोंगरकर यांच्या बद्दल कमालीची आस्था, आनंद व्यक्त होत आहे.याचे कारणही तसेच आहे कारण कित्तेक वर्षांपासून राजुरा आगारात असे नियमबद्द अधिकारी आलेच नाही.आले ते फक्त पैसे कमावण्यासाठी त्यामुळे वारंवार कोणत्या ना कोणत्या कारणाने राजुरा डेपो चर्चेत राहत होता परंतु आता चांगल्या कामामुळे चर्चेत आहे हे खरंच कौतुकास्पद आहे.प्रत्येक नानाल्या दोन बाजू असतात त्याच प्रमाणे आपल्याला इते पण पाहायला मिळत आहे.प्रवाशी सुखावले मात्र काम चोर आणि निष्काळजी चालक वाहक व इतर कर्मचारी यांच्या पोटात दुकने सुरू झाले.कारण काही चालक वाहक हे अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून फिक्स शेड्युल चालत होते व पूर्ण किलोमिटर फेरी मारत नव्हते जे की रोटेशन नुसार चालायला पाहिजे आणि शेड्युल नुसार किलोमिटर पूर्ण करायला पाहिजे. बस फलाट क्रमांक नुसार लावल्या जात नाही . प्रवाश्यांना तिकीट फुसट देतात व झीरो ची तिकीट फाडून पैसे घेणे असे अनेक शकली लडविल्या जात आहे. यामुळे जे चालक वाहक खरोखर प्रामाणिक कार्य करीत आहेत त्यांची मात्र चांगलीच पिळवणूक होत आहे.परंतु आता नवीन आगार व्यवस्थापक येताच कामचुकार व्यवस्थाच बदलली रोटेशन पद्दत आली, किलोमिटर पूर्ण करणे अनिवार्य झाले.राजुरा परिसरातील नागरिक आनंदी होऊन हेच अधिकारी नियमित राहावे आणि लालपरी अशीच वेळेवर यावी अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .